# थेस्सलनीकाकरांस दुसरे पत्र

**( Second Thessaionians)**

**१**,१ पौल आणि सिल्वान व तीमथ्य यांच्याकडून थेस्सलनीकाकरांच्या मंडळीला जे आमचे बाप परमेश्वर आणि येशू ख्रिस्तात आहेत.
२,३ **आमचे** पिता परमेश्वर आणि प्रभु येशू ख्रिस्ताद्वारे तुम्हांला कृपा व शांति असो. **हे बंधूंनो**, तुमच्याविषयी आम्ही नेहमी परमेश्वराची
उपकारस्तुति करणे योग्यच आहे; कारण तुमचा विश्वास खूप वाढत चालला आहे, आणि तुम्हां सर्वांतील प्रत्येकाचे प्रेम
४ आपसात खूप वाढत चालले आहे; **येथपर्यंत** की आम्ही परमेश्वराच्या मंडळ्यांतून तुमच्या विषयी आनंदित होतो; कारण
५ जितका छळ व उपद्रव तुम्ही सोशिला, त्या सर्वाद्वारे तुमची सहनशीलता व विश्वास प्रगट झाला आहे, **ते** परमेश्वराच्या
खऱ्या न्यायाचे स्पष्ट प्रमाण आहे, की तुम्ही ज्यासाठी **दु:ख** सहन करत आहात त्यामुळे परमेश्वराच्या राज्याच्या योग्य
६ तुम्ही ठरले जावे. **कारण** परमेश्वराच्या दृष्टीने असे न्याय्य आहे की जे तुम्हांला दु:ख देतात, त्यांना मोबदल्यात दु:खच
७ मिळावे; **आणि** तुम्ही जे संकट सहन करता, आम्हांबरोबर तुम्हांस विश्रांति मिळो. त्या वेळी जेव्हा ते आपल्या सामर्थ्यवान
८ दूतांबरोबर स्वर्गातून अग्निज्वालेसह प्रगट होतील तेव्हा **जे** परमेश्वराला ओळखत नाहीत आणि आपल्या प्रभु येशूची
९ सुवार्ता मानीत नाहीत, त्यांचा सूड घेतील. **ते** प्रभुच्या समोरुन व त्यांच्या सामर्थ्याच्या गौरवापासून दूर केले जाऊन युगानुयुगाचा

---

१:१ १ थेस्स १:१ "सिल्वान - सीला तोच आहे.

१:२ रोम १:७

१:३ रोम १:८ इ. "**तुमचा विश्वास खूप वाढत जातो**"---"**प्रेम खूप होत जाते.**" १ थेस्स ३:१०, १२; ४:१०.त्यांच्यासाठी पौलाची आशा पूर्ण होत होती, आणि त्याच्या प्रार्थनांचे उत्तर मिळत होते.

१:४ **'गर्व**" - २ करिंथ ७:१४. ही खुशामद नव्हती. - १ थेस्स २:५. तो त्या मंडळीच्या स्थितित देखील आनंदी होता.

"**दु:ख आणि संकट**" - १ थेस्स १:६; २:१४; ३:३.

१:५ "**प्रमाण**" आपल्या ख्रिस्ती विश्वासाचे प्रमाण म्हणजे - पारखले जाण्यात, छळात, सहनशीलतेने ते सोशीत जाणे. यासाठी की आपला विश्वास खरा व जिवंत आहे. हेच परमेश्वराच्या खऱ्या न्यायाचे देखील प्रमाण आहे. याचा अर्थ अगदी स्पष्ट नाही. कद्‌चित याचा आशय असा आहे की त्यांचे परमेश्वराच्या निर्णयाने निवडले जाणे व त्यांच्यात कार्य करणे, त्यांच्याच विश्वासात स्थिर असण्याचे प्रमाण आहे. फिलि १:२७,२८ शी तुलना करा "योग्य ठरले" लूक २०:३५; प्रगटी ३:४ शी तुलना करा. तारण प्राप्ती किंवा परमेश्वरांच्या राज्यात प्रवेश प्राप्त करण्या योग्य कोणीच नाही. रोम ३:९, १९, २३; कल १:१३,१४. विश्वासू आपल्या विश्वासात व चरित्रात स्थिर राहून ही पुष्टि करतात की परमेश्वराने त्यांचा पालट केला आहे. त्यांच्या राज्यात राहणाऱ्या लायकीचे त्यांना बनवले जेणे करुन ते त्या राज्यात योग्य प्रकारे जिवंत राहू शकतात.

"**परमेश्वराचे राज्य**" - मत्तय ४:१७ चे नोट्‌स पहा.

"**दु:ख**" रोम ८:१७; मत्तय ५:१०. हे त्यांच्या योग्यतेचे प्रमाण होते. त्यांच्या राज्याकरता जे दु:ख सोसण्यास नकार देतात, ते त्या राज्याच्या लायकीचे नाहीत.

१:६ "**परमेश्वर---दु:ख देईल**" - हे बायबलचे एक सत्य होय. (अनु ३२:४; स्तोत्र ९:१६; ११:७; ८९:१४; १११:७; नीति २९:२६; यशया ३०:१८; दानी ४:३७; रोम ३:२६; प्रगटी १५:३; १६:५-७). जे मन परिवर्तनासाठी तयार नसतात, त्यांना दंड देऊन; आणि जे त्यांच्या राज्यासाठी दु:ख सहन करावयास तयार असतात त्यांना अनंत विश्राम देऊन, परमेश्वर आपला न्याय प्रगट करतात. (वचन ७) रोम २:६-११ शी तुलना करा. आणि गणना ३१:१-३; अन ३२:३५-४१; रोम १२:१९; इब्री १०:३० यांना देखील पहा.

१:७ "**प्रभु येशू---प्रगट होतील**" परमेश्वर कधीकधी लोकांशी सूड घेतात आणि तेथे राहणाऱ्या विश्वासूंचे रक्षण करतात. अधिकांश गोष्टींच्या संबंधात लोकांचा न्याय प्रभु येशू ख्रिस्ताच्या त्या युगाच्या शेवटी त्यांच्या आल्यानंतरच होईल.तेव्हाच सर्व गोष्टी व्यवस्थित केल्या जातील; न्याय स्थापित केला जाईल. लोक हे पाहतील की न्याय प्रबळ आहे.

"**प्रगट होतील**" तेव्हा परमेश्वराच्या लोकांना विश्रांति मिळेल. त्यापूर्वी असे होणार नाही. मत्तय २४:२९, ३०; १ करिंथ १:७; तीताला २:१३ शी तुलना करा,

"**देवदूत**" मत्तय २४:३१; यहूदा १४.

१:८ "**अग्नि**" इब्री १०:२७; १२:२९; २ पेत्र ३:७; प्रगट १९:११-१६; यशया ६६:१५; ३०:२७; २४:६

"**सूड घेणे**" परमेश्वर कोणालाहि दंड देऊ इच्छित नाही. यहे १८:२३, ३०-३२; योएल २:१३; २ पेत्र ३:१. लोक पश्चाताप करत नाहीत, पापात कायम राहतात, तेव्हा न्यायी असल्यामुळे परमेश्वर त्यांना दंड देतात. निर्गम ३४:६,७; नहूम १:३. जर परमेश्वर अपराध्याला दंड देत नाहीत तर ते न्यायी नाहीत, आणि असा योग्य क्रम नसल्यामुळे जग अस्त व्यस्त होईल.

१:९ "**अनंत विनाश**" - २:३; मत्तय ७:१३; रोम ९:२२; गल ६:८; फिलि ३:१९; १ थेस्स ५:३; १ तीमथ्य ६:९; २ पेत्र ३:७,१२,१६; प्रगटी १७:८,११. विनाश म्हणजे संपूर्ण नाश (प्रगटी २१:८). बायबल असे सांगत नाही की अशा लोकांचे जीवन समाप्त होते. मत्तय २५:४६; लूक १६:२६ शी तुलना करा. "**प्रभुच्या समोरुन**" मत्तय ७:२३;२५:४१; प्रगटी २२:१५,२६ शी तुलना करा. त्यांच्या सर्वनाशाचा हाच अर्थ होय. ते अशा परमेश्वरापासून वेगळ केले जातील; जे आशीर्वाद, आनंद आणि शांतिचे स्त्रोत आहेत. आपल्या जीवनकाळात त्यांनी याचीच निवड केली होती. (वचन ८) हेच त्यांना मिळेल. न्याय हाच आहे की त्यांना शिक्षा मिळावी.

१० नाश, ही शिक्षा प्राप्त करतील. हे **त्या** दिवशी होईल जेव्हा परमेश्वर आपल्या पवित्र जनांत गौरव प्राप्त करण्यासाठी आणि सर्व
११ विश्वासूंसाठी आश्चर्याचे कारण होण्यासाठी येतील. कारण आम्ही दिलेल्या साक्षीवर तुम्ही विश्वास ठेवला **म्हणून** आम्ही
नेहमी तुमच्यासाठी अशी प्रार्थना करतो की परमेश्वराने तुमच्या पाचारणाला योग्य जाणावे आणि चांगुलपणाची
१२ प्रत्येक इच्छा आणि विश्वासाचे प्रत्येक कार्य सामर्थ्याने पूर्ण करावे. **ह्यासाठी** की आपले परमेश्वर आणि प्रभू
२,१ येशू ख्रिस्ताच्या ठायी तुम्ही, आणि तुमच्या ठायी त्यांनी गौरव प्राप्त करावे. **हे बंधूंनो** आम्ही आपल्या प्रभु येशू ख्रिस्ताच्या
२ आगमनाविषयी आणि त्यांच्या जवळ आपले एकत्र होणे ह्या संबंधाने विनंती करत आहे **की**, कोणत्याहि आत्म्याने किंवा
वचनाने किंवा पत्राद्वारे की जणू काय आमच्याकडूनच आले आणि प्रभुचा दिवस येऊन ठेपला आहे असे समजून तुमचे

---

**"त्यांच्या गौरवाच्या सामर्थ्यांने"** यश २:१०-११, १९, २१.

१.१० **"गौरव"** योहान १७:१०; इफि १:१२-१४.

**"संत-पवित्र"** - ख्रिस्तात सर्व खरे विश्वासू. रोम १:७; १ पेत्र २:९.

"गौरव" (महिमा) जेव्हा आपण त्यांना तसेच पाहू जसे ते आहेत त्यासमयी आम्ही किती आनंदाने ओतप्रोत होऊन जाऊ. विश्वास करणाऱ्या पवित्र लोकांच्यात ख्रिस्त गौरव प्राप्त करतात, आणि असेच लोक गौरव प्राप्त करतील. इतर दुसरे आपल्या अविश्वासामुळे व व्यवहाराने निरंतर त्यांचा अपमान करतील

**"तुम्ही आमच्या साक्षीवर विश्वास ठेवला"** - १ थेस्स १:७-१०

**"त्या दिवशी"** - १ थेस्स ५:२; यश २:१२ शी तुलना करा.

१:११ **'नेहमी तुमच्याकरता प्रार्थना करतो"** - रोम १:८,९; इफि १:१६; ३:१६; फिलि १:४,९; कल १:३, ९, २१; १ थेस्स १:२; ३:१०.

**"योग्य"** वचन ५; इफि ४:१; रोम १:६; ८:३० पहा.

**"प्रत्येक कार्य सामर्थ्याने पूर्ण करावे"** स्तोत्र ९०:१७; यश २६:१२ शी तुलना करा. यासाठी ते आमच्यात कार्य करतात. आपण विश्वासाच्या कोणत्याहि कार्याला पूर्ण करण्यास समर्थ आहोत. फिलि २:१३. इफि २:१.

१:१२ **"नांव"** जगापुढे ख्रिस्ती लोक ख्रिस्ताचे नाव ठेवतात. (१ पेत्र ५:१६).

**"तुमच्या ठायी गौरव प्राप्त करावे"** जेव्हा ख्रिस्त येतील तेव्हा असे होईल. आता देखील असेच व्हावयास हवे. - १ करिंथ ६:२०. - (वचन १०) १ करिंथ १०:३१; कल ३:१७; १ पेत्र ४:११.

**"तुम्ही त्यांच्या ठायी"** ज्या लोकांत येशू ख्रिस्ताला (आदर व प्रशंसा) गौरव प्राप्त झाले आहे, त्या लोकांत ते सुद्धागौरव प्राप्त करतील. योहान १७:१०, २२; रोम ८:३०.

**"कृपा"** विश्वासूंच्या तारणाशी संबंधित आशीर्वादाशी जुळलेली प्रत्येक बाब परमेश्वराच्या दयेवर अवलंबून आहे. (रोम ६:२३; इफि २:८,९) या वचनाच्या शेवटच्या भागाला या प्रकारे देखील म्हटले जाऊ शकते.

"आपले परमेश्वर आणि प्रभु येशू ख्रिस्तांची कृपा."

२:१ **"आपल्या प्रभु येशूंचे आगमन"** १:७; प्रेषित १:११.

**'त्यांच्या जवळ आपले एकत्र होणे"** - १ थेस्स ४:१७; योहान १४:३; मत्तय २४:३१ शी तुलना करा. सामान्यत: याला "रैप्चर" म्हटले जाते. (उचलून वर नेणे)

२:२ **"पत्राद्वारे जणुकाय आमच्याकडून आलेले"** आपल्याला माहित नाही की या विश्वासूंना कोण त्रास देत होते. कदाचित पौल येथे खोट्या शिक्षकांकडे इशारा करतो, ज्यांनी (त्याच्या विचारानुसार) कदाचित त्याच्या पत्राची नक्कल करण्यात देखील संकोच केला नसता, व म्हणाले असते की हे पत्र पौलानेच लिहिले आहे; किंवा आणखी दुसऱ्या तऱ्हेने दु:खी केले असते. दुसऱ्या पत्रांत पौल अशा शिक्षकांचे चरित्र दाखवतो. रोम १६:१७,१८; २ करिंथ ११:१३-१५, इ. सत्याचे शत्रू जेव्हा याच्याशी संघर्ष करतात, तेव्हा आपण आशा ठेवू नये की ते नैतिक असतील.

**'प्रभुचा दिवस"** - फिलि १:१०; २:१६. याचा अर्थ आहे, ख्रिस्ताचे द्वितीय आगमन. १ थेस्स १:८ यात याला "ख्रिस्त येशूचा दिवस" असे म्हटले आहे. १ थेस्स ५:२ च्या "प्रभुच्या दिवसा" च्या प्रारंभी ख्रिस्त येतील. काही लोक म्हणतात की, उचलून वर नेण्याच्या काही वर्षांपूर्वी प्रथम त्यांचे आगमन होईल परंतु स्व:त पौलाने असे कधी म्हटले नाही. १ थेस्स ४:१६-१७. पौलाला वाटत होते की थेस्सलनीकाच्या विश्वासूंनी, ख्रिस्ताचा दिवस आलेला आहे, असा विचार करु नये; किंवा असे हि नाही की पौलाला ख्रिस्ताच्या येण्याबद्दल पूर्ण समज नव्हती. त्यांचा मते जर पौल याविषयी चूक करत होता, तर ते म्हणू शकत होते की; सुवार्तेच्या व इतर विषयांच्या बाबतीत देखील तो चुकीचे शिक्षण देत होता; आणि याचे परिणाम अतिशय दुख:पूर्ण होऊ शकत होते.

**'कोणी तुम्हांस फसवू नये (धोका)"** - विश्वासूंना एका सत्यापासून दूर करुन दुसऱ्या सत्याकडे नेणारे अनेक धोकादायक लोक नेहमी असतीलच. मत्तय २४:४; रोम १६:१८; इफि २:६; कल २:४ शी तुलना करा परमेश्वराचे वचन काय सांगते याविषयी सतर्क राहण्याची फार आवश्यकता आहे.

३ हृदय अचानक अस्थिर होता कामा नये; आणि घाबरु देखील नये. **कोणत्याही** प्रकारे कोणा कडूनहि फसू (धोक्यात)
४ नका कारण तो दिवस येणार नाही जोपर्यंत विश्वासाचा त्याग होऊन तो पापाचा पुरुष अर्थात नाशाचा पुत्र होणार; **जो** विरोध
करतो आणि प्रत्येक जण ज्याला देव किंवा पूज्यनीय म्हणतात, त्या सर्वांपेक्षा स्वत:ला उंच करतो; इतका अधिक की तो
५ परमेश्वराच्या मंदिरात बसून स्वत:ला परमेश्वर म्हणत प्रदर्शन करतो. **तुम्हांला** आठवण नाही काय की मी तुमच्याकडे
६ असतांना ह्या गोष्टी तुम्हाला सांगत असे? **आणि** तुम्ही त्या वस्तुबद्दल जाणता जी त्यावर प्रतिबंध करत आहे, यासाठी
७ की त्याने नेमलेल्या समयीच प्रगट व्हावे; **कारण** अनीतीचे रहस्य आताहि आपले कार्य चालवतच आहे; परंतु आता एक

---

**''जो पर्यंत''** पौल एका अशा घटनेविषयी चर्चा करतो जी ख्रिस्ताच्या दिवसा (प्रभुचा दिवस) आधी येणार आहे. तो असे म्हणत नाही की ही **उचलले जाण्याची घटना होय.** जर त्याने विश्वास केला असता, की प्रभुचा दिवस प्रारंभी येईल, तर असे सांगण्याचा

एक आदर्श समय असला असता; परंतु तो असे करत नाही. या विपरीत तो ''विश्वास त्यागाची'' गोष्ट करतो. येथे ग्रीक भाषेत ''बंडखोरी'' किंवा ''त्यागणे'' किंवा ''विश्वास त्याग'' असे आहे. सामान्यत: याचा अर्थ, आपले मत किंवा विश्वास किंवा त्याच्या सिद्धांतापासून दूर जाणे होय. प्रथम मानवाने केलेली आज्ञा भंगाची क्रिया (उत्पत्ति अध्याय ३) आरंभापासून परमेश्वराच्या विरोधात बंडखोरी करणारी आणि परमेश्वरापासून दूर जात राहणारीच आहे. याविषयी परमेश्वराचे स्वत:चे लोक -इस्त्राएली, या सर्व लोकांचे प्रतिनिधि होत. अनु ९:७,२४; स्तोत्र १०६:४३; यशया १:२; यिर्म ६:२८. प्रत्येक प्रकारचे पाप बंडखोरीचे चिन्ह आहे. (१ योहान ३:४ पहा) जो या युगाच्या शेवटी होणार आहे त्या अंतिम विद्रोहा विषयी किंवा सत्यापासून दूर जाण्याविषयी पौलाने लिहिले आहे. याचा प्रभाव पृथ्वीच्या सर्व धर्मांवर व लोकांवर (ख्रिस्ताचे शिक्षण त्यागणारे ख्रिस्ती) होईल. वचन ४; मत्तय २४:१०-२५; २ तीमथ्य ३:१-५; प्रगटी १३:४,८,१३-१५.

**''पापाचा पुत्र''** हा विद्रोह अशा एका व्यक्तिद्वारे चालवला जाईल जो इतका पापमय असेल की बंडखोरी व वाईटाच जणुकाय साक्षात रुपच असेल. येणारा ख्रिस्त विरोधी हाच आहे, - १ योहान २:१८,

**''विनाशाचा पुत्र''** योहान १०:७ शी तुलना करा. याचा अर्थ आहे, तो व्यक्ति जो विनाशाने बांधलेला आणि ज्याचा नाश निश्चितच आहे.

२:४ **''पापाचा पुत्र''** हा एक असाधारण, राजनैतिक आणि मिलिट्री (सेना) नेता असेल, तो ईश्वर होण्याचा दावा करेल आणि पृथ्वीच्या प्रत्येक व्यक्तिने त्याची उपासना करावी अशी अपेक्षा करेल. त्याच्या हृदयात परमेश्वर किंवा मनुष्याने बनवलेले नियम याविषयी कोणत्याहि प्रकारचा सन्मान राहणार नाही. स्वभाव व चरित्र यांत तो ख्रिस्ताच्या अगदी उलट असेल. (इब्री १०:७; स्तोत्र ४०:८) जग ख्रिस्ताला पसंत करत नाही; त्यामुळे ते ख्रिस्त विरोधीकडे आकर्षिले जातील. **ते परमेश्वराच्या नियमांचे पालन करणारे नसल्यामुळे** अनीतीमानाचे (ख्रिस्त विरोधी) सहज होऊ शकतील.

**''स्वत:ला उंच करतो''** दानी ७:८, ११,२०,२५; प्रगटी १३:५,६

**''परमेश्वराचे मंदिर''** - सत्य परमेश्वराच्या उपासनेकरता समर्पित इमारत. मत्तय २४:१५; मार्क १३:१४ शी तुलना करा.

**''स्वत:ला परमेश्वर म्हणून प्रदर्शन करतो''** हे शेवटचे पाप होय. बायबलच्या मते, जर कोणी स्वत:ला परमेश्वर म्हणतो तर ती परमेश्वराची निंदा आहे. योहान ५:१८, १०:३१-३३; मत्तय २६:६४,६५. विद्रोह व दुष्टता जेव्हा साक्षात दिसते तेव्हा ती दुष्टतेची चरम सीमा ठरते. परमेश्वर सामर्थी सृष्टिकर्ता आहेत. त्यांनी सर्वांची रचना केली आहे. सर्व लोक पापी आहेत. उत्पत्ति ८:२१; लेवीय २०:७; यश ६:३; रोम ३:९-२३; १ पेत्र १:१५,१६.

२:५ **''जेव्हा मी तुमच्याकडे आलो''** पौल थोडया काळासाठी त्यांच्यासोबत होता. त्याचा विचार होता की त्यांना दिलेल्या शिक्षणात येशूचे द्वितीय आगमन हा एक प्रमुख विषय होता.

२:६,७ जोपर्यंत परमेश्वराची नियोजीत वेळ पूर्ण होत नाही कोणीतरी व्यक्ति या सामर्थी विरोधकाला प्रगट होण्यापासून थांबवेल. पौलाने असे शिक्षण दिले होते. की हा सामर्थी व्यक्ति कोण आहे. या पत्रात त्याने त्याच्या शब्दांची पुनरावृत्ती केलेली नाही म्हणून याचा अर्थ काय आहे, आपल्याला ठाऊक नाही. पण म्हणून यामुळे आपण अडून बसू शकत नाही. या विषयावर लोक आपापले अनुमान लावत राहिलेले आहेत. काही विश्वासूंचे म्हणणे आहे की पौलाचा अर्थ म्हणजे पवित्र आत्मा; त्या ख्रिस्त विरोधीला प्रगट होण्यापासून थांबवेल असा आहे. यांच्या मते **''जोपर्यंत तो काढला जात नाही''** याचा अर्थ मंडळीचे वर जाणे होय. येथे पवित्र आत्मा, मंडळी किंवा मंडळीला वर घेतले जाण्याविषयी नाही. कारण जर पौलाचा अर्थ येथे पवित्र आत्म्याशी होता, तर **''जो पर्यंत तो काढला जात नाही''** याचा संबंध मंडळीला वर उचलले जाणे असे असणे आवश्यक नाही. महाक्लेश किंवा मंडळीच्या वर जाण्यापूर्वी पवित्र आत्म्याचे काढले जाणे या शिक्षणाशी जुळलेली एक समस्या ही आहे की संपूर्ण महासंकटाच्या काळातहि, काही प्रकारचे विश्वासू किंवा संत राहतील (प्रगट ७:९-१७; १३:६ इ.) हे कसे शक्य आहे की जेव्हा त्यांना पृथ्वीवर पवित्र आत्म्याची सर्वात जास्त गरज राहणार तेव्हा पवित्र आत्म्याशिवाय ते या पृथ्वीवर सोडून दिले जातील?

**''जोपर्यंत काढला जात नाही''** याचा अर्थ देखील स्पष्ट नाही. खरे म्हटले तर याचा अर्थ होईल; **''जो पर्यंत तो आमच्या**

८ थांबवणारा आहे जोपर्यंत तो काढला जात नाही, तो त्याला प्रतिबंध करत राहणार. **तेव्हा** तो अनीतिमान् प्रगट होईल,
९ ज्याला प्रभु येशू आपल्या मुखातील श्वासाने मारुन टाकतील आणि आपल्या आगमनाच्या तेजाने भस्म करतील **त्या**
१० अनीतिमानाचे येणे, सैतानाच्या कार्यानुसार सर्व प्रकारचे खोटे सामर्थ्य आणि चिन्हें आणि अद्भुत कामें **आणि** नाश
होणाऱ्यांसाठी अनीतिची सर्व कामे कपटाने केली जातील, कारण त्यांनी सत्याचे प्रेम आपलेसे केले नाही; ज्याद्वारे त्यांचे तारण
११ झाले असते. **आणि** याच कारणाने त्यांच्यात एक भटकवणारे सामर्थ्य पाठवतील यासाठी की त्यांनी असत्यावर विश्वास ठेवावा,

---

**मधून काढला जात नाही''** याचा आशय, मार्गातून वेगळे होणे असा होऊ शकतो. निश्चित रीतिने येथे वर उचलले जाण्याकडे संकेत केलेला नाही. मधूनच काढले जाण्याच्या संकेतात हे स्पष्ट नाही की काही आणखी; आणि इतर कोणी यासोबत आहेत. आपल्याला असे देखील सांगितले गेले नाही की ''कोणामधून'' तो काढला जातो. असे संदेहास्पद वाक्यांश घेऊन, त्याच्यावर भर देऊन, ते मंडळीच्या वर जाण्याशीच संबंधित आहे असे म्हणणे योग्य नाही. काही दुसरे हणतात की वचन ६ यात तो एखादया देवदूताकडे इशारा करतो. या युगाच्या शेवटी निश्चितच देवदूत पुष्कळ क्रियाशील होतील. प्रगटी ७:१; ९:१४,१५ इ. (शब्द देवदूत एक किंवा अनेक वचन - प्रगटी. जवळजवळ ८० दा हा आलेला शब्द आहे) हे शक्य आहे की परमेश्वराने योग्य समय येण्यापूर्वी ख्रिस्त विरोधीच्या प्रगटीकरणात प्रतिबंध लावलेला आहे. हा विचार दुसऱ्या विचाराप्रमाणेच वाढतो. येथे वारंवार ही गोष्ट सांगण्याची गरज आहे; पौलाने याचा अर्थ सांगितला नाही म्हणून आपल्याला सुद्धा माहित नाही.

**''आचारसंहितेच्या विरोधाचे रहस्य''** (नियम) या विषयी मत्तय १३:११; रोम ११:२५; १६:२५; १ करिंथ १५:५१ इ. पहा जर परमेश्वराने आपल्यावर प्रगट केले नसते तर अनीती आणि दुष्टता यांच्या अंतिम विकासाबद्दल आपण काहीच जाणू शकलो नसतो. पौलाच्या समयी

दुष्टता कार्यरत होती. जोपर्यंत पापाचा पुरुष प्रगट होत नाही, तोपर्यंत ही कार्य करत आहे आणि करत राहणार. अनीति पूर्ण रीतिने विकसित झालेली असणार. नियम आणि आचारसंहिता पूर्णपणे त्यागीली जाईल. संपूर्ण पृथ्वीवर एक दुष्ट व्यक्ति राज्य करेल.

२:८ जरी हा अनीतिपूर्ण सामर्थी असेल तरी तो ख्रिस्तापूढे उभा राहू शकणार नाही. पहा प्रगटी १९:१९,२०.

**''मुखाच्या श्वासाने''** यश ११:४. ग्रीक भाषेत हा शब्द ''श्वास'' म्हणजे आत्मा देखील होतो. याचा इशारा त्याच्या सामर्थी शब्दाकडे सुद्धा आहे. (इब्री १:३; ४:१२ शी तुलना करा) ख्रिस्ताचे बोलणे अवश्य होईल आणि त्यांचे उद्देश पूर्ण होणारच. (तुलना करा. उत्पत्ति १:३ इ. यश ५५:११)

**''आगमनाचे तेज''** मत्तय २४:३०; २५:३१; तीताला २:१३; प्रगटी १९:११,१२.

२:९ प्रभु येशू ख्रिस्ताचे येणे परमेश्वराच्या कार्यानुरुप होते. ख्रिस्त विरोधीचे येणे देखील सैतानाच्या कार्यक्रमाचा एक भाग असणार. (प्रगटी १३:२) या जगातील खऱ्या स्थितीचे हे सत्य आपण समजू शकतो का, की मानव जातिसाठी हा ख्रिस्त विरोधी अधिक प्रसिद्धी प्राप्त करणार. प्रगट १:१०,११; ५:४३ शी तुलना करा.

**''सामर्थ्य - अद्भुत''** मत्तय २४:२४ पहा आणि प्रगटी १३:१३,१५ पहा. कदाचित ही आश्चर्यकर्मे ख्रिस्ताने केलेल्या आश्चर्य कर्मांसारखीच असतील. (प्रेषित २:२२ पहा जेथे हेच शब्द वापरले गेले आहेत) परंतु आश्चर्यकर्मे ''खोटे''असतील. ग्रीक शब्दाचा अर्थ

**''अवास्तविक''** किंवा **''खोटा''** होऊ शकतो. परंतु कदाचित याचा अर्थ येथे आहे **''धोका देणारा''** दुसऱ्या शब्दांत ती खरीखुरी आश्चर्यकर्मे असतील ज्यांना पाहून लोक खोटयावर विश्वास ठेवतील.

२:१० **''अनीतिचे सर्व प्रकारचे कपट''** दुष्टता लोकांना धोका देते. (इब्री ३:१३ शी तुलना करा ) ही जगातील तीन दुष्ट शक्त्यांपैकी एक आहे (इतर दोन साठी यिर्म १७:९ आणि प्रगट १२:८ पहा. या युगाच्या अंती तिन्ही शक्त्या, भयंकर रीतिने विकसित होऊन जातील.

**''नाश होणारे''** १ करिंथ १:१८; २ करिंथ २:१५; ४:३; योहान ३:१६. नाश होणारे ते आहेत जे परमेश्वराच्या सत्याचे नाहीत, परंतु पापाचे प्रेमी आहेत. त्यांना सत्य आवडत नाही आणि ते मुद्दाम सत्याचा तिरस्कार करतात. त्यांच्या पापमय स्वभावाला जे आवडते तेच करण्याची इच्छा करतात. योहान ३:१९,२०; रोम १:१८. याठिकाणी सत्याप्रति प्रेम आणि तारण यातील जो संबंध पौल दाखवतो त्याकडे लक्ष दया. आपण एकाशिवाय दुसरे प्राप्त करु शकत नाही.

२:११ **''खोटेपणा''** ख्रिस्त विरोधी असे प्रतिपादित करतो की तो स्वत: परमेश्वर आहे (वचन ४) लोक इतक्या धोक्यात राहतील की ते खोट्यावरच विश्वास ठेवतील आणि परमेश्वर असे होऊ देतील. (रोम १:२८; ११:८; यष २९:१०; ६:१०; १ राजे २२:१९-२३). सत्याचा तिरस्कार केल्यामुळे त्यांच्यावर हा दंड येईल. परिमाणाच्या दृष्टिने हा दंड अगदी योग्य असेल. पापी लोक ज्या लायकीचे आहेत, त्यांना तसाच दंड मिळेल. स्तोत्र १८:२५,२६ आणि टिपणे पहा. सर्वांत भयंकर कार्य जे मनुष्य करु शकतो ते म्हणजे सत्यास नकार देणे. याचा परिणाम म्हणजे केवळ खोटयाची प्रतीतिच नव्हे परंतु सार्वकालिक दंड असा होईल.

**''अनितिमत्ता''** - मत्तय २३:३३; मार्क १६:१६; योहान ३:१८; ५:२८; गल १:८.

**''अनितिमत्ता''** - दुष्टतेत आनंदित होणे व सत्यावर विश्वास ठेवणे हे दोन्ही एकमेकांच्या विपरीत आहेत. जर आपण एकाचे पालन करत असू तर दुसऱ्याचे करु शकत नाही.

१२,१३ **आणि** जितक्यांनी सत्यावर विश्वास ठेवला नाही, परंतु अनीतित प्रसन्न झालेत त्या सर्वांनी दंड प्राप्त करावा. **पण** हे
बंधुंनो, आणि प्रभुच्या प्रिय लोकांनो, तुमच्या विषयी आम्ही नेहमी परमेश्वराची स्तुति केली पाहिजे, कारण परमेश्वराने
१४ तुम्हाला प्रारंभापासून निवडले, यासाठी की आत्म्याद्वारे पवित्र होऊन आणि सत्यावरच्या विश्वासाद्वारे तारण प्राप्त करावे. **ज्या**
साठी त्यांनी तुम्हाला आमच्या सुवार्तेद्वारे पाचारण केले याकरता की तुम्ही आमच्या प्रभु येशू ख्रिस्ताचे गौरव प्राप्त
१५ करावे. **तर मग** हे भावांनो, स्थिर राहा, आणि ज्या ज्या गोष्टी तुम्ही वचन, किंवा पत्राद्वारे आमच्यापासून शिकलात, ते
१६ बळकट धरुन राहा. **आपला** प्रभु येशू ख्रिस्त स्वत: आणि आपले परमेश्वर बाप ज्यांनी आपल्यावर प्रेम केले, आणि
१७ कृपेने अनंत शांति आणि उत्तम आशा दिली. तुमच्या मनात शांति देवो, **आणि** तुम्हाला प्रत्येक चांगल्या कामात आणि
**३**,१ वचनात स्थिर करो. बंधुजनहो, आता इतकेच करा की आमच्यासाठी प्रार्थना करा की प्रभुचे वचन प्रगती करो, गौरव प्राप्त
२ करो, जसे तुमच्यात झाले **आणि** हेकेखोर व दुष्ट माणसांपासून आमचे रक्षण व्हावे कारण प्रत्येकाच्या ठायी विश्वास
३,४ नाही.परंतु प्रभु सत्य परमेश्वर आहेत **ते** तुम्हांला दृढतेने स्थिर करतील; आणि त्या दुष्टापासून सुरक्षित ठेवतील **आम्हाला**
तुमच्याविषयी प्रभुमध्ये भरवंसा आहे की जी जी आज्ञा आम्ही तुम्हाला दिली आहे, त्यांचे तुम्ही पालन करता व करत

---

२:१३ **"प्रभुच्या प्रिय लोकांनो''** कलस्सै ३:१२; १ थेस्स १:४; १ योहान ३:१.

**'परमेश्वराने तुम्हांला प्रारंभापासून निवडले''** - इफि १:४.

**"आत्म्याद्वारे पवित्र होऊन''** - १ पेत्र १:२ याचा अर्थ असा की परमेश्वर त्या लोकांना वेगळे करतात ज्यांना त्यांनी निवडले आहे; ज्याना पवित्र बनवण्यासाठी त्यांनी त्यांच्यात आपले कार्य आरंभ केले आहे. काही लोकांच्या बाबतीत हे खरे नाही परंतु प्रत्येकाच्या बाबतीत "सत्याची प्रतीति करुन'' लोकांना तारण देण्यासाठी परमेश्वर याच पद्धतीचा उपयोग करतात. सत्यावर ज्याप्रकारे वजन टाकले गेले आहे त्यावर लक्ष द्या; ज्याप्रमाणे तो पुढच्या वचनात सांगतो. पौल येथे ख्रिस्ताच्या सुवार्तेकडे इशारा करतो.

२:१४ **'बोलावले----पाचारण केले''** - रोम १:६; ८:२८,३०.

**"आमची सुवार्ता''** ज्याविषयी त्या लोकांनी घोषणा केली आणि ज्याची जबाबदारी ख्रिस्ताने त्यांच्यावर सोपवली होती. (गल १:११,१२; १ करिंथ १५:१-८).

**"गौरव प्राप्त करावे''** - १ थेस्स २:१२; रोम ५:२; ८:१७; योहान २७:२२. सत्यावर विश्वास करणाऱ्यांत व न करणाऱ्यांत हेच अंतर राहील - एक समूह अनंत गौरव प्राप्त करेल - दुसरा समुह अनंत दंड (वचन १२) रोम ९:२२-२४ शी तुलना करा.

२:१५ **"म्हणून ---तर मग''** त्यांच्याद्वारे दिल्या गेलेल्या सत्याच्या प्रकाशात, तो त्यांना आणि आम्हाला देखील सत्यास बळकट धरुन राहवयास सांगतो - रोम १२:१;
इफि ४:१ आणि कलस्सै ३:१ शी तुलना करा.

**"स्थिर राहा''** - १ करिंथ १५:५८; इफि ६:११,१३,१४.

२:१६ बाप व येशू यांच्यामध्ये जी मैत्री आहे त्याविषयी पौलाने जे शिक्षण दिले त्याकडे लक्ष द्या. मत्तय ३:१६,१७; २८:१९;योहान १७:१; २ योहान ३.

'प्रेम केले'' - वचन १३; यिर्म ३१:३.

**'आशा''** - १ पेत्र १:३; रोम ५:२; ८:२४,२५.

२:१७ **'शांति किंवा प्रोत्साहन''** - २ करिंथ - १:३,४. लोक एकमेकांना शांति देऊ शकतात; परंतु योग्य प्रकारचे प्रोत्साहन केवळ परमेश्वरापासून प्राप्त होते.

**३:१** **'आमच्या करता प्रार्थना करत राहा''** - रोम १५:३०-३२; इफि ६:१९,२०; कल ४:३,४.

**'वचन अति वेगाने प्रगती करत गौरवप्राप्त करो''** - पौलाने कोणत्याहि मंडळीला अशी प्रार्थना करावयास सांगितले नाही, की परमेश्वराच्या कार्यासाठी भौतिक वस्तु किंवा धन त्यांनी प्राप्त करावे. त्याचे मन आणि लक्ष दुसऱ्या गोष्टींवर लागलेले होते. जर आपण परमेश्वराची सेवा खरोखर करु इच्छितो तर आपणदेखील पौलासारखे व्हावे.

३:२ यावेळी पौल करिंथ येथे होता आणि दुष्ट लोक त्याला विरोध करत होते. प्रेषित १८:१२,१३.

३:३ **'सत्य ''** - १ करिंथ १:९; १०:१३; १ थेस्स ५:२४; २ तीमथ्य २:१३; इब्री ३:६; १ पेत्र ४:१९; १ योहान १:९; प्रगटी १९:११

**"दुष्टापासून''**- मत्तय ६:१३; योहान १७:११,१५.

३:४ **'प्रभुवर भरंवसा''**- २ करिंथ २:३; ७:४; गल ५:१०; इब्री ६:९.

**"जी जी आज्ञा आम्ही तुम्हाला देत आहोत''** - ख्रिस्ताच्या राजदूताच्या रुपात (२ करिंथ ५:२०) ज्याला परमेश्वराने सत्याचे विशेष प्रकाशन दिले होते; (गल १:११,१२; इफि ३:२,३); पौल ख्रिस्ताच्या नावाने पूर्ण अधिकाराने बोलू शकला : (वचन ६) ख्रिस्ताकडून त्याला ज्या आज्ञा मिळाल्यात त्या त्याने मंडळींना पत्राद्वारे कळविल्यात.

३:५ **'प्रेम''** - इफि ३:१७-१९; रोम ५:५.

**"ख्रिस्ताची सहनशीलता''** जेव्हा ख्रिस्त या पृथ्वीवर होते, त्यांनी मानव आणि सैतान यांचा सर्व विरोधी असतांना देखील सहनशीलतेने परमेश्वराची इच्छा पूर्ण केली. आपल्या हृदयातहि ते स्वत: असेच करतात. इब्री १२:१-३ शी तुलना करा.

५ राहणार. **परमेश्वराच्या** प्रेमाकडे आणि ख्रिस्ताच्या सहनशीलतेकडे प्रभु तुमच्या मनांचे मार्गदर्शन करोत
६ **हे बंधूंनो** आम्ही तुम्हांला प्रभु येशू ख्रिस्ताच्या नांवाने शिक्षण देतो की अनुचित वागणुकीद्वारे आणि जे शिक्षण
७ एखाद्याने आमच्याकडून प्राप्त केले, त्यानुसार करत नाही अशा प्रत्येक बंधुपासून तुम्ही दूर रहावे. **तुम्ही** स्वत: जाणता
की, कशाप्रकारे आमच्याप्रमाणे वागणूक ठेवावी, कारण आम्ही देखील तुमच्यामध्ये अव्यवस्थितपणाने वागलो नाही,
८ **आणि** कोणाचे अन्न फुकट खाल्ले नाही, परंतु परिश्रम व कष्ट करुन रात्रंदिवस काम केले, याकरता की
९ तुमच्यापैकी कोणावर सुद्धा भार घालू नये. **असे** नाही की, स्वत:ला तुमच्या पुढे आदर्श ठरवावे यासाठी; परंतु तुम्ही
१० आमच्याप्रमाणे वागावे; ह्याकरता असे केले. **जेव्हा** आम्ही तुमच्या येथे होतो, तेव्हा सुद्धा आम्ही तुम्हाला आज्ञा केली
होती की जर कोणाला काम करण्याची इच्छा नसेल तर त्याने खाऊं हि नये. आम्ही असे ऐकतो की तुमच्यात कित्येक
११,१२ **लोक** अव्यवस्थित वागतात आणि काम न करता दुसऱ्यांच्या कामात लुडबुड करतात. **अशा** लोकांना आम्ही प्रभु येशू
१३ ख्रिस्ताच्या नांवाने आज्ञा देतो व बोध करतो की त्यांनी शांतपणे काम करुन आपलेच अन्न खावे. **आणि** तुम्ही, हे भावांनो
१४ बरे करण्यात धैर्य न सोडावे. **जर** कोणी आमच्या या पत्रा तील गोष्टींचे पालन केले नाही तर, त्याकडे लक्ष ठेवा; आणि
१५ त्याला लाज वाटावी म्हणून त्याची संगत धरु नका; **तरी** त्याला शत्रू समजू नका; परंतु भाऊ समजून त्याची
१६ कानउघाडणी करुन त्याला सावध करा. **आता** प्रभु जो शांतिचा झरा आहे, स्वत: तुम्हांला सर्वदा आणि प्रत्येक प्रकारे
१७ शांति देवो; प्रभु तुम्हांसर्वांबरोबर असो. **मी** पौल तुम्हाला आपल्या हातांनी सलाम लिहित आहे. प्रत्येक पत्रात माझी हीच
१८ खूण आहे: मी अशाच प्रकारे लिहितो. **आपल्या** प्रभु येशू ख्रिस्ताची असीम कृपा तुम्हां सर्वांवर होत राहो.

---

३:६ **"प्रभु येशूच्या नांवाने''** - प्रभुच्या अधिकाराने (वचन ४) विश्वासूंनी ही आज्ञ, ख्रिस्तांच्या आज्ञेच्या रुपात घ्यावी.
**"वेगळे रहावे''** याचा अर्थ पूर्ण रीतिने संबंध तोडणे नव्हे; परंतु जवळची सहभागिता - संगती टाळणे. याचा आशय यापेक्षाहि जास्त होऊ शकतो. जर कोणी भाऊ किंवा बहिण पौलाच्या शिक्षणाच्या आधारे जीवन व्यतित करत नाही तर आपण त्यांच्या सारखा व्यवहार करु नये. या उलट, आपण त्यांना स्पष्ट सांगितले पाहिजे की या गोष्टींनी परमेश्वर किंवा आम्ही देखील प्रसन्न होत नाही. वचन १४,१५ शी तुलना करा.

३:७,८ **"आमच्याप्रमाणे वागणूक ठेवा''** - प्रेषित १८:३; २०:३४,३५.

३:९ **"अधिकार''** - १ करिंथ ९:१२-१५.
**"आदर्श''** - केवळ परिश्रम करण्यातच नव्हे तर ख्रिस्ती जीवन कसे जगावे, या सर्व गोष्टीत पौल आपल्या सर्वांसाठी एक नमूना आहे. (१ करिंथ ११:१; फिलि ३:१७)

३:१० **"जर कोणी काम करु इच्छित नाही''** - तो अशा लोकांकडे इशारा करत नाही; परंतु त्या लोकांसाठी जे संधि मिळाल्यानंतरही काम करावयास तयार नाहीत.

३:११ **'दुसऱ्यांच्या कामात लुडबुड करतात''** - १ तीमथ्य ५:१३. आळसामुळे सामान्यत: लोक दुसऱ्यांच्या कार्यात हात घालतात; यामुळे पापावर पाप वाढत जाते; परिणामी संपूर्ण मंडळीला समस्या सोसावी लागते.

३:१३ गल ६:९; १ करिंथ १५:५८.

३:१४,१५ वचन ६ वरील नोट्स पहा. आज्ञाभंग करणाऱ्या ख्रिस्ती लोकांना अनुशासित करण्यासाठी पौल त्यांना निक्षून सांगतो -वचन ६ वरील नोट्स पहा. अनुशासनामुळे ते आपल्या वागणूकीबद्दल लज्जित होतील व परमेश्वराच्या इच्छेप्रमाणे वागायला सुरवात करतील.

३:१६ **"शांतिचा झरा''** - रोम १५:३३; १६:२०; २ करिंथ १३:११; फिलि ४:९; १ थेस्स ५:२३; इब्री १३:२० शी तुलना करा
**'शांति''** - ख्रिस्त - ज्यांचा मार्ग शांति दाखवतो त्याला पौल फिलि ४:६,७ मध्ये दाखवतो.

३:१७ पौलाने काही ( कदाचित सर्वच) पत्रांना दुसऱ्यांच्या द्वारे लिहिले. रोम १६:२२ शी तुलना करा. त्याच्या नावाचा उपयोग करुन खोट्या शिक्षकांनी मंडळ्यांना पत्र लिहू नये, याबद्दल तो सतर्क होता २:२. आपल्या सर्व पत्राच्या शेवटी तो आपल्या हातांनी काही लिहित असे - १ करिंथ १६:२१; गल ६:११; कल ४:१८ पहा

३:१८ रोम १:७; १६:२०